**आदेश**

जा.क्र. पोसआ/४३५२/२०२४
पोलीस सह आयुक्त, पुणे शहर
यांचे कार्यालय दि.२७/०३/२०२४

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) प्रमाणे प्रतिबंधक कारवाईबाबत.**

आमचे असे निदर्शनास आले आहे की, कसबा पेठ भागात फरासखाना पोलीस स्टेशन हद्दीत पवळे चौक ते कुंभार वेस चौक दरम्यान काही कारणामुळे कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था बिघडविण्याच्या उद्देशाने बाहेरील परिसरातील व्यक्ती एकत्र जमुन प्रक्षोभक बोलणे, आक्षेपार्ह घोषणा देणे, चिथावणीखोर वक्तव्य करणे तसेच आक्षेपार्ह पोस्ट सोशल मिडीयाच्या व अन्य सामाजिक माध्यमाव्दारे प्रसारीत करुन सामाजिक अस्थिरता, धार्मीक तेढ निर्माण केली जाऊ शकते. त्यामुळे मनुष्याचे जीवीतास तसेच खाजगी व सार्वजनिक मालमत्तेस धोका उत्पन्न होण्याचा संभव आहे. अशी माझी खात्री झाली आहे.

मी **प्रविण पवार**, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता **१९७३** च्या कलम **१४४** (१) प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी असा आदेश देतो की, पुणे शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत फरासखाना पोलीस ठाणे हद्दीतील पवळे चौक ते कुंभार वेस सार्वजनिक रोडवर तसेच भोई गल्ली, कागदीपुरा, कुंभारवाडा, आलोकनगर सोसायटी व अग्रवाल तालीम येथील सार्वजनिक रोडवर स्थानिक राहणारे व्यक्तीखेरीज इतर बाहेरील व्यक्तींना प्रार्थनेकरीता, आरतीकरीता एकत्र येण्यास, सदर परिसरात प्रवेश करणेस, थांबुन राहणेस प्रतिबंध क़रण्यात येत आहे. तसेच स्थानिक अथवा बाहेरील व्यक्तींना खालील बाबीकरीता मनाई करण्यात येत आहे.

मुद्दा क्रमांक २,३ व ४ हे संपुर्ण पुणे पोलीस आयुक्तालय हद्दीत लागु करण्यात येत आहे.

१) कोणत्याही परिस्थितीत वैद्यकीय कारणा व्यतिरिक्त ०५ किंवा ०५ पेक्षा जास्त इसम एकत्रित जमणार नाहीत.
२) कोणाच्याही धार्मिक भावना दुखावतील किंवा विभिन्न जातीधर्माच्या दोन गटामध्ये तेढ निर्माण होईल असे कोणतेही कृत्य, वक्तव्य करणार नाहीत व अफवा पसरवणार नाहीत.
३) जातीय भावना भडकवणारे आक्षेपार्ह संदेश समाजमाध्यमाद्वारे प्रसारित करणार नाहीत, तसेच आक्षेपार्ह पोस्ट टाकणार नाही व समाजमांध्यमाचा गैर वापर करणार नाहीत.
४) विनापरवाना कोणतेही रॅली, धरणे, मोर्चाचे किंवा कोणत्याही कार्यक्रमाचे आयोजन करणार नाही.

हा आदेश दिनांक २८/०३/२०२४ रोजी रात्रौ. ००.०१ वाजता ते दि.१०/०४/२०२४ रोजी २४.०० वाजेपर्यंत अंमलात असेल.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील.

**सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्यानिशी आज दि.२७/०३/२०२४ रोजी दिलेला आहे.**

पोलीस सह आयुक्त पुणे शहर

२७/३

**(प्रविण पवार)**
**पोलीस सह आयुक्त, पुणे शहर.**

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- २७/०३/२०२४

**प्रत :- सविनय सादर**

१. मा. अपर मुख्य सचिव गृह(विशेष) मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. मा. आयुक्त व अपर पोलीस महासंचालक, राज्य गुप्तवार्ता विभाग म राज्य, मुंबई
४. मा. पोलीस आयुक्त व अपर पोलीस महासंचालक, पुणे शहर

**प्रत :- सस्नेह अग्रेषित**

१. मा.विभागीय आयुक्त पुणे विभाग.
२. मा.आयुक्त, म न पा पुणे/पिंपरी चिंचवड पुणे.
३. मा.जिल्हा सत्र न्यायाधिश व जिल्हा न्यायदंडाधिकारी पुणे यांचेसाठी जादा प्रति
४. मा.जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी पुणे.

**प्रत :-**

१. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण/उत्तर प्रादेशिक विभाग/गुन्हे/प्रशासन, पुणे शहर.
२. सर्व पोलीस उप आयुक्त/सहायक पोलीस आयुक्त/वरीष्ठ पोलीस अभियोक्ता, पुणे शहर
३.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, पुणे.

२/- या आदेशाचे स्थानिक वृत्तपत्रातून केवळ बातमी म्हणून प्रसिध्दी अशा विनंतीसह

४. सर्व पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन/शाखा, पुणे शहर.

२/- सर्व पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी यांनी सदर आदेशाचे प्रति महत्वाच्या ठिकाणी चिटकाव्यात ध्वनीक्षेपकाव्दारे किंवा अन्य मार्गाने प्रक्षेपित करून योग्य ती प्रसिध्दी करावी, त्या बाबत योग्य त्या नोंदी अभिलेखावर ठेवाव्यात.